दैनिक
MAHILA SANVAD
# महिला संवाद

आवृत्ती : पुणे PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224 इतर आवृत्ती : मुंबई - जालना- छत्रपती संभाजीनगर - सोलापूर - सातारा

संपादक : ज्योती मधुकर आडेकर ▮ कार्यकारी संपादक : विद्या जाधव ▮ उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड

**महिला प्रतिनिधी पाहिजेत**

जालना आणि पुणे येथून प्रकाशित होणारे महिला संवाद या मराठी वृत्तपत्रासाठी जिल्हा, तालुका आणि सर्कलसाठी महिला प्रतिनिधी पाहिजेत.

सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय आणि भौगोलिक माहिती असणाऱ्यांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

महिला संवाद

कार्यालय

दैनिक महिला संवाद,

गांधी चमन, सावित्रीबाई फुले चौक, जालना. 9168567111

PUNE : Volume No. 1, Issue No. 245, Marathi Daily Wednesday, Date - 25 March 2026 Price 2 Rupees, Pages - 4

पुणे अवृत्ती | वर्ष १ ले | अंक २४५ वा | मराठी दैनिक | बुधवार दि. २५ मार्च २०२६ | किंमत २ रुपये | पाने ४

# पुण्यात महिलांसाठी सुरक्षेचा कवच

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे : शहरातील महिलांच्या सुरक्षितता, आर्थिक स्वावलंबन आणि सर्वांगीण सक्षमीकरणासाठी पुणे महानगरपालिकेकडून विविध महत्त्वाकांक्षी उपक्रम जाहीर करण्यात आले आहेत. महिलांना आत्मविश्वास मिळावा, कोणत्याही परिस्थितीत स्वतःचे संरक्षण करता यावे आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम बनता यावे, हा या उपक्रमांचा मुख्य उद्देश असल्याचे महापालिकेच्या वतीने सांगण्यात आले.

या अंतर्गत सर्वप्रथम शहरात स्वसंरक्षण प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात येणार आहे. या केंद्रांमध्ये महिलांना ज्युडो, कराटे, लाठी-काठी, योग आणि शारीरिक व्यायामाचे प्रशिक्षण दिले जाईल. यामुळे महिलांना संभाव्य धोक्याच्या परिस्थितीत स्वतःचे संरक्षण करण्याची क्षमता विकसित होणार आहे. वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर हा उपक्रम महत्त्वाचा मानला जात आहे. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणावरही विशेष भर देण्यात आला आहे. महिला बचत गटांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षणासोबतच त्यांच्या उत्पादनांना कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध करून देण्याची योजना आखण्यात आली आहे. यामुळे महिलांना बचत, व्यवसाय व्यवस्थापन आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन त्यांचा आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग अधिक मजबूत होणार आहे.



याशिवाय, महिलांसाठी विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. दहावी आणि बारावीच्या विद्यार्थिनींसाठी खासगी क्लासेस, सीईटी परीक्षांसाठी आर्थिक सहाय्य, कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेसाठी अनुदान, मुलगी दत्तक योजना, रमाई स्वावलंबन योजना, संजय गांधी निरा अनुदान योजना आणि इंदिरा गांधी विधवा निवृत्तीवेतन योजना अशा अनेक उपक्रमांचा यात समावेश आहे. बचत गटांना निधी उपलब्ध करून देणे, तसेच स्वसंरक्षण आणि योगासन वर्गही नियमितपणे आयोजित केले जाणार आहेत. महिलांच्या मालकी हक्काला चालना देण्यासाठी महापालिकेकडून महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. ३१ मार्च २०२६ पर्यंत ५०० चौ.फुटांपर्यंतच्या मालमत्तांवर महिलांना ५० टक्के करमाफी देण्यात येणार आहे. यामुळे महिलांच्या नावावर मालमत्ता नोंदणी वाढण्यास मदत होईल आणि त्यांच्या आर्थिक सुरक्षिततेत भर पडेल.

महिला उद्योजक, बचत गट आणि सामाजिक संस्थांसाठी स्वतंत्र कन्व्हेन्शन सेंटर उभारण्याची योजना देखील जाहीर करण्यात आली आहे. या केंद्रामध्ये प्रशिक्षण, परिषद, प्रदर्शन आणि विविध संवाद कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. यामुळे महिलांना आपले कौशल्य प्रदर्शित करण्यासाठी आणि नेटवर्किंगसाठी एक व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. शहरातील शाळांमध्ये किशोरवयीन मुलींसाठी 'पिंक रूम' तयार करण्यात येणार आहेत. या कक्षांमध्ये मुलींना शारीरिक, मानसिक आणि शैक्षणिक मार्गदर्शन दिले जाईल. तसेच, राणी लक्ष्मीबाई महिला सक्षमीकरण योजनेअंतर्गत महिलांना कौटुंबिक सल्ला, कायदेशीर मार्गदर्शन आणि मानसिक-सामाजिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. या सर्व उपक्रमांमुळे पुण्यातील महिलांना अधिक सशक्त बनवण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे. महिलांचा समाजातील सहभाग वाढवणे आणि त्यांचे जीवनमान उंचावणे हा यामागील उद्देश असला, तरी शहरातील वाढत्या महिलांवरील अत्याचारांच्या पार्श्वभूमीवर या योजनांचा प्रत्यक्ष परिणाम कितपत होईल, याकडे आता पुणेकरांचे लक्ष लागले आहे.

**पाहिजेत**

महाराष्ट्रातील निर्भिड आणि निष्पक्ष दैनिक महिला संवाद या वृत्तपत्रासाठी पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यात प्रतिनिधी पाहिजेत इच्छुकांनी खालील प्रत्यावर अथवा क्रमांकावर संपर्क साधावा.

अनंत पार्क काळेवाडी रोड राहटणी धनगर बाबा मंदिरा जवळ पुणे शहर पुणे-४३१००३

संपर्क - 9168567111

वरील क्रमांकावर बायोडाटा पाठवावा

## थोडक्यात...

### जिल्हा परिषद शाळेच्या वर्गात अघोरी कृत्य



**रायगड । प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील रेवदंडा येथील मारुती आळीतील जिल्हा परिषद प्राथमिक मुलांची शाळा या विद्येच्या पवित्र मंदिरात अघोरी अंधश्रद्धेच्या कृत्याने घुसखोरी झाली. अज्ञात व्यक्तींनी शाळेच्या पाठीमागील दरवाजा तोडून वर्गात भाकरीचे पीठ, लिंबू, लाल दोरे, तुटलेल्या बांगड्या आणि करणी साहित्य पसरवले. दरवाजाजवळ व बाथरूम परिसरात रक्तासारखे डाग सापडल्याने परिसरात भीती व संतापाची लाट उसळली आहे. मुख्याध्यापक उल्हास राणे यांनी रेवदंडा पोलिसांना सूचित केले असून, पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून तपास सुरू केला आहे.

स्थानिक नागरिकांमध्ये या घटनेमागे शाळेवर करणी करण्याचा उद्देश असल्याचा संशय व्यक्त होत आहे. विशेषतः, मराठी शाळा बंद पाडून त्या जागी मॉल किंवा बिल्डिंग बांधण्याचा राजकीय डाव असल्याची चर्चा जोर धरत आहे. रेवदंड्यात आधीच एक मराठी शाळा जमीनदोस्त करण्यात आली असून, ही शाळाही उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप होत आहे. विद्येच्या मंदिरात अंधविश्वास घुसवून मराठी अस्मितेला धक्का लावण्याचा हा कट असल्यास शासनाने डोळे उघडावेत! असे स्थानिकांचे मत आहे.भ्रष्टाचाराचा बिंग फुटण्याची शक्यता? या शाळेत जानेवारी २०२५ ते जानेवारी २०२६ दरम्यान पेव्हर ब्लॉक बसविण्याचे काम झाले. सदर कामाची वर्कऑर्डर, इस्टिमेट, ठेकेदार, कामाची किंमत, योजनेची माहिती व सही शिक्के मागणारी ठळख ठळख कार्यकर्त्यांनी रेवदंडा ग्रामपंचायतीकडे दाखल केली आहे. या कामात भ्रष्टाचार असल्याचा संशय व्यक्त होत असून, अघोरी कृत्य हे भ्रष्टाचार झाकण्यासाठी आणि जनतेला घाबरवण्यासाठी केले गेले असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. अंधश्रद्धेच्या नावाखाली राजकारणींचा बळीचा प्रकार चालला तर महाराष्ट्र शासन काय बघत आहे? असा सवाल उपस्थित होत आहे.मुंबईत विधानमंडळ अधिवेशन सुरू असताना शासनाने या प्रकरणाची दखल घेऊन उच्चस्तरीय चौकशीची घोषणा करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे. मराठी शाळा लाटण्याचा डाव यशस्वी होईपर्यंत बघ्याची भूमिका घेणार का? की तात्काळ कारवाई करणार? याकडे संपूर्ण रायगडचे डोळे लागले आहेत. पोलिस तपासात राजकीय व भ्रष्टाचाराचे धागे उलगडले तर हा खळबळजनक प्रकार ठरेल.

## दर्शनासाठी निघालेल्या भाविकांवर काळाचा घाला

**सातारा । प्रतिनिधी**

राज्यातील अपघाताच्या घटना कमी होण्यासाठी सरकारकडून प्रयत्न सुरू असताता. मात्र, गेल्या काही महिन्यांत रस्ते अपघाताच्या घटना वाढतच असल्याचे दिसून येत आहे. महामार्गावरील अपघाताच्या घटना वाढत आहेत. त्यातच, सातारा जिल्ह्यात आता अपघाताची घटना घडली असून अक पिकअप पलटी होऊन झालेल्या अपघातात १ महिला ठार झाली असून ९ जण जखमी झाले आहेत. अपघातानंतर स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेत मदत व बचावकार्य सुरू केलं.



जिल्ह्याच्या पाटण तालुक्यात असलेल्या निवकणे येथे जानाई देवीच्या दर्शनासाठी निघालेल्या भाविकांची पिकअप गाडी जळव घाटात पलटी होऊन अपघात झाला. या अपघातात एक महिला जागीच ठार झाली असून आठ ते दहा जण जखमी झाले आहेत. त्यामध्ये तीन भाविक गंभीर जखमी असून त्यांना पुढील उपचाराकरिता सातारा येथे तर उर्वरित जखमीना तारळे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले आहे. जळव व आसपासच्या स्थानिक ग्रामस्थांनी वेगाने हालचाल करीत जखमींना तातडीने रुग्णालयात नेले आहे. चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने गाडी पलटी झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. पोलिसांनी देखील घटनास्थळी धाव घेतली असून मदत कार्य सुरू केले आहे. स्थानिकांच्या मदतीने जखमींना रुग्णालयात दाखल केले असून उपचार सुरू आहेत.

## महाराष्ट्र लोक भवन येथे बिहार राज्य स्थापना दिवस साजरा




**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र लोकभवन येथे 'बिहार राज्य स्थापना दिवस' साजरा करण्यात आला. 'एक भारत श्रेष्ठ भारत' उपक्रमाचा भाग म्हणून महाराष्ट्र लोकभवनातर्फे बिहार राज्य स्थापना दिनाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम मुंबई विद्यापीठाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला.

बिहार ही संस्कृती, अध्यात्म व तत्वज्ञानाची भूमी आहे. या भूमीने देशाला भगवान महावीर व भगवान बुद्ध दिले. भारत आज जगातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र आहे. परंतु त्याहीपेक्षा भारत लोकशाहीची जननी आहे व या लोकशाहीची पाळेमुळे बिहारमधील बुद्ध संघाच्या कार्यप्रणालीमध्ये आहे व त्यामुळे बिहार ही संसदीय परंपरांची जन्मभूमी आहे, असे प्रतिपादन राज्यपालांनी यावेळी केले. बिहार येथील लोक महाराष्ट्रासह देशाच्या विभिन्न राज्यांमध्ये योगदान देत आहेत. मूळचे बिहार येथील अधिकारी आज अनेक राज्यात भारतीय प्रशासकीय सेवा व भारतीय पोलीस सेवेच्या माध्यमातून योगदान देत आहेत. बिहारी लोक देशाच्या सर्व भागात आहेत. त्रिपुरासह देशाच्या उत्तर पूर्व राज्यात देखील बिहारी जनता वसली असून तेथेही 'छट पूजा' साजरी केली जाते, आज बिहार समृद्ध इतिहासाची भविष्यातील विकासाची सांगड घालत आहे. भारत हा केवळ सीमा, सैन्य व परराष्ट्र धोरण असलेला देश नसून भारत हे संस्कृती व ज्ञान परंपरा असलेले राष्ट्र आहे. देशातील राज्याराज्यांमध्ये विविधता असली तरीही देशात एकात्मतेचा विचार सखोल रुजला आहे असे राज्यपालांनी सांगितले. यावेळी मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी बिहारचे लोकनृत्य व भोजपुरी गीत यांचा समावेश असलेला सांस्कृतिक कार्यक्रम साजरा केला. या सादरीकरणाबद्दल विद्यापीठाच्या सांस्कृतिक चमूचे अभिनंदन करताना बिहारच्या गीत, नृत्य व संगीतात जोश आहे, असे राज्यपालांनी सांगितले.

यावेळी बिहारचे राज्यपाल लेफ्टनंट जनरल (से.नि.) सय्यद अता हसनैन यांचा संदेश व्हिडिओच्या माध्यमातून दाखविण्यात आला. बिहार राज्याची समग्र माहिती देणारी चित्रफीत देखील यावेळी दाखवण्यात आली.

या सांस्कृतिक कार्यक्रमात मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी मिथिला प्रदेशाचे लोकनृत्य झिझिया व जट-जटिन सादर केले तसेच एक भोजपुरी गीत देखील सादर केले.

राज्यपालांचे सचिव डॉ प्रशांत नारनवरे यांनी प्रास्ताविक केले तर शिक्षण शाखेतील कक्ष अधिकारी वंदना मोरमारे यांनी आभार प्रदर्शन केले. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु प्रो. रविंद्र कुलकर्णी व प्रकुलगुरु प्रा. अजय भामरे यांनी राज्यपालांचा सत्कार केला. कार्यक्रमाला राज्यपालांचे सहसचिव एस राममूर्ती, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. सुनील पाटील, सांस्कृतिक कार्यक्रमांचे समन्वयक निलेश सावे, विद्यापीठाचे विद्यार्थी तसेच लोकभवन येथील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## एसटी महामंडळाच्या 'राजमाता जिजाऊ' बस सेवेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यात अत्याधुनिक सुविधांनी सज्ज 'राजमाता जिजाऊ' या बस सेवेचा लोकार्पण सोहळा पार पडला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या नव्या बस सेवेची आजपासून सुरुवात करण्यात आली.




विधानभवन प्रांगणात पार पडलेल्या या सोहळ्यास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, दोन्ही विधामंडळाचे सदस्य, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक माधव कुसेकर, अशोक लेलँडचे वरिष्ठ व्यवस्थापक जॉन मॅथ्यू, टाटा मोटर्सचे ग्लोबल हेड सुशांत नाईक आदी उपस्थित होते.

'राजमाता जिजाऊ' या नावाने सुरू करण्यात आलेली ही बस सेवा महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाची आठवण करून देणारी असून, राजमाता जिजाबाई यांच्या प्रेरणादायी कार्याला अभिवादन करणारी आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या राजमाता जिजाऊंच्या स्मरणार्थ ही बस सेवा सुरू करण्यात आली आहे. या नव्या उपक्रमांतर्गत सुमारे ३ हजार बसेस राज्यभरात टप्प्याटप्प्याने दाखल होणार असून, प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी आणि आधुनिक प्रवासाचा अनुभव मिळणार आहे. एसटी महामंडळाच्या ताफ्यात यापूर्वी 'शिवनेरी', 'शिवशाही', 'शिवाई', 'हिरकणी' आणि 'यशवंती' अशा विविध सेवांचा समावेश असून, 'राजमाता जिजाऊ' ही बस सेवा त्या मालिकेत आणखी एक महत्त्वाची भर असणार आहे. या उपक्रमामुळे राज्यातील सार्वजनिक परिवहन अधिक सक्षम आणि प्रवासी-केंद्रित होण्यास मदत होणार आहे.

मुख्यमंत्री फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी बसचे पूजन करून आणि फीत कापून या सेवेचा शुभारंभ केला. या बस सेवेचे लोकार्पण झाल्यानंतर उपस्थित मान्यवरांनी बसमधून प्रवास केला. यावेळी बसच्या समोर प्रतिकात्मक स्वरूपात घोड्यावर आरूढ झालेल्या राजमाता जिजाऊ यांच्या देखाव्यामुळे हा लोकार्पण सोहळा ऐतिहासिक आणि प्रेरणादायी ठरला.

## हिंदू, शीख, बौद्धच पात्र; धर्मांतरितांना SC दर्जा नाकारला

**दिल्ली । प्रतिनिधी**

धर्मांतर केल्याने अनुसूचित जातीच्या निकषात राहता येणार नाही असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने (SC) दिला आहे. ट्रॉसिटी प्रकरणी एका प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाचा यासंदर्भातील निर्वाळा देत महत्त्वाचं निरीक्षण नोंदवलं आहे. अनुसूचित जातीमधील एखाद्या व्यक्तीने हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्माव्यतिरिक्त इतर धर्म स्वीकारल्यास अनुसूचित जातीचा निकष लागू होणार नाही. धर्मांतरित व्यक्तींना SC/ST अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत संरक्षण मिळणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. ख्रिश्चन धर्मातील व्यक्तीने ॲट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. त्यावरुन, सर्वाच्च न्यायालयापर्यंत हे प्रकरण पोहोचले होते.

ख्रिश्चन धर्म स्वीकारल्यानंतर व्यक्ती तांत्रिकदृष्ट्या अनुसूचित जातीचा राहत नाही, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले आहे. घटनात्मक दृष्ट्या अनुसूचित जातीच्या निकषांसाठी केवळ हिंदू, शीख आणि बौद्ध धर्मीयांनाच पात्रता आहे. याप्रकरणी, सर्वोच्च न्यायालयाने १९५० च्या आदेशाचा आधार घेतला आहे, न्यायमूर्ती पी.के. मिश्रा आणि एन.व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने याबाबतचा निर्णय दिला.

धर्मांतरामुळे मूळ जातीय ओळख कायदेशीररित्या संपते, ख्रिश्चन धर्मात जातिव्यवस्था अधिकृतपणे मान्य नसल्याचा उल्लेख कोर्टाने केला आहे. आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवत धर्मांतरित व्यक्तीला SC/ST कायद्यांतर्गत सर्वोच्च न्यायालयाने अधिकार नाकारले आहेत. चिंतडा आनंद यांच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने आज निकाल दिला. जातीच्या नावाखाली मारहाण आणि जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचा आरोप आनंद यांनी केला होता. याप्रकरणी, आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने गुन्हा रद्द करण्याचा निर्णय घेतला होता, त्यामध्ये धर्मांतरामुळे अनुसूचित जाती हक्क गमावल्याचा निर्णय न्यायालयाने दिला. सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेऊन संबंधित याचिका फेटाळली आहे.



आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने मे २०२५ मध्ये दिलेल्या निर्णयाविरुद्ध पास्टर चिंथडा आनंद यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या अपिलावर सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला असून उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवण्यात आला आहे. याप्रकरणी, अक्काला रामिरेड्डी आणि इतरांकडून जातीय भेदभाव आणि छळाचा सामना करावा लागला, असा आरोप आनंद यांनी केला होता. त्यानंतर, अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती कायद्यांतर्गत आनंद यांनी त्यांच्याविरुद्ध तक्रार दाखल केली आणि पोलिसांनी त्या आधारावर एफआयआर नोंदवला. त्यानंतर रामिरेड्डी यांनी हे प्रकरण रद्द करण्यासाठी उच्च न्यायालयात धाव घेतली.

# संपादकीय...

## स्वसंरक्षण ते स्वावलंबन

पुणे शहरात महिलांच्या सुरक्षितता, आर्थिक स्वावलंबन आणि सक्षमीकरणासाठी महानगरपालिकेकडून जाहीर करण्यात आलेले उपक्रम हे निश्चितच स्वागतार्ह आणि काळाची गरज ओळखणारे पाऊल आहे. गेल्या काही वर्षांत महिलांवरील अत्याचारांच्या वाढत्या घटनांमुळे केवळ कायद्याची अंमलबजावणी पुरेशी ठरत नाही, तर महिलांना स्वतः सक्षम बनवण्याची गरज अधोरेखित झाली आहे. या पार्श्वभूमीवर स्वसंरक्षण प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याचा निर्णय अत्यंत महत्त्वाचा ठरतो. महिलांना ज्युडो, कराटे, लाठी-काठी यांसारख्या प्रशिक्षणाद्वारे आत्मसंरक्षणाचे कौशल्य मिळणे ही केवळ शारीरिक तयारी नाही, तर मानसिक बळकटीही आहे. आत्मविश्वास हीच खरी सुरक्षिततेची पहिली पायरी असते. मात्र, या प्रशिक्षणाची अंमलबजावणी किती व्यापक आणि सातत्यपूर्ण राहते, हे पाहणे तितकेच आवश्यक आहे. शहराच्या सर्व भागांतील महिलांपर्यंत हे प्रशिक्षण पोहोचले पाहिजे, अन्यथा हा उपक्रम काही मर्यादित घटकांपुरताच राहण्याचा धोका आहे. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी बचत गटांना प्रशिक्षण आणि बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचा निर्णयही सकारात्मक आहे. आजच्या काळात आर्थिक स्वावलंबन हे महिलांच्या सशक्तीकरणाचे मुख्य साधन मानले जाते. महिलांना रोजगार आणि व्यवसायाच्या संधी मिळाल्यास त्यांचे सामाजिक स्थान उंचावते, तसेच त्यांच्या निर्णयक्षमतेतही वाढ होते. मात्र, केवळ योजना जाहीर करून चालणार नाही; त्या प्रभावीपणे राबवण्यासाठी प्रशासनाने ठोस यंत्रणा उभी करणे आवश्यक आहे. शैक्षणिक आणि सामाजिक योजनांचा समावेश हा या उपक्रमांचा आणखी एक महत्त्वाचा पैलू आहे. विद्यार्थिनींसाठी शैक्षणिक मदत, विविध अनुदान योजना आणि विधवा महिलांसाठी सहाय्य या उपाययोजना समाजातील दुर्बल घटकांना बळ देणाऱ्या आहेत. 'पिंक रूम' सारख्या संकल्पना किशोरवयीन मुलींसाठी सुरक्षित आणि मार्गदर्शक वातावरण निर्माण करू शकतात. मात्र, या उपक्रमांचा दर्जा, देखभाल आणि योग्य मार्गदर्शनाची उपलब्धता यावरच त्याचे यश अवलंबून राहील.
महिलांच्या मालकी हक्कासाठी ५० टक्के करमाफी हा निर्णय आर्थिकदृष्ट्या मोठा बदल घडवू शकतो. महिलांच्या नावावर मालमत्ता नोंदणी वाढल्यास त्यांचे आर्थिक सुरक्षिततेचे जाळे अधिक मजबूत होईल. परंतु, या सवलतींचा गैरवापर होणार नाही याची दक्षता घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे.
महिला उद्योजकांसाठी कन्व्हेन्शन सेंटर उभारण्याची कल्पना ही दीर्घकालीन दृष्टीकोन दर्शवते. प्रशिक्षण, प्रदर्शन आणि संवादासाठी स्वतंत्र व्यासपीठ उपलब्ध झाल्यास महिलांच्या व्यवसायाला चालना मिळू शकते. यामुळे महिला केवळ रोजगार शोधणाऱ्या न राहता रोजगार निर्माण करणाऱ्या बनू शकतात. तथापि, या सर्व उपक्रमांच्या पार्श्वभूमीवर एक महत्त्वाचा प्रश्न कायम राहतो-या योजना महिलांवरील अत्याचार कमी करण्यात कितपत प्रभावी ठरणार? महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न केवळ प्रशिक्षण किंवा योजनांपुरता मर्यादित नाही. त्यासाठी कायदा-सुव्यवस्थेची कडक अंमलबजावणी, सामाजिक मानसिकतेत बदल आणि महिलांविषयी आदराची भावना निर्माण होणे आवश्यक आहे. पुणे महानगरपालिकेने जाहीर केलेले उपक्रम हे निश्चितच सकारात्मक दिशा दाखवणारे आहेत. मात्र, यशस्वी होण्यासाठी केवळ घोषणांपेक्षा प्रभावी अंमलबजावणी, सातत्य आणि जनसहभाग अत्यावश्यक आहे. महिलांना खऱ्या अर्थाने सशक्त बनवायचे असेल, तर प्रशासन, समाज आणि महिलांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याची गरज आहे. पुणे शहर या उपक्रमांच्या माध्यमातून एक आदर्श निर्माण करू शकेल का, हे येणारा काळच ठरवेल.

# निसर्गोपचार आश्रमाचे शारीरिक-मानसिक आरोग्याबरोबरच ग्रामीण विकासातही मोलाचे योगदान - उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन

**पुणे । प्रतिनिधी**

महात्मा गांधीजींनी स्थापन केलेल्या निसर्गोपचार आश्रमाने केवळ व्यक्तींना शारीरिक-मानसिक आरोग्यच प्रदान केले नाही, तर ग्रामीण विकासातही मोलाचे योगदान दिले आहे. ग्रामीण लोकांशी संस्थेने जोडून घेतलेले नाते आणि त्यांना शाश्वतता व स्वावलंबनाचे धडे देण्यासाठी देण्यात येत असलेले प्रशिक्षण अत्यंत प्रशंसनीय आहे, असे प्रतिपादन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.




उरुळी कांचन (ता. हवेली) येथील निसर्गोपचार आश्रमाच्या ८१ व्या स्थापना दिवस कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी राज्यपाल जिष्णू देव वर्मा, राज्यसभेचे उपसभापती हरिवंश नारायण सिंह, राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार माऊली उर्फ ज्ञानेश्वर कटके, आश्रमाचे व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. नारायण हेगडे, वैद्यकीय संचालक आणि विश्वस्त सचिव डॉ. अभिषेक देवीकर, श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान आळंदीचे मुख्य विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे उपस्थित होते.

उपराष्ट्रपती म्हणाले, उरुळी कांचन या गावात महात्मा गांधीजींनी मणिभाई देसाई, बाळकोबा भावे, श्रीमती गंगाबेन भाटे आणि इतर सहकाऱ्यांच्या मदतीने १९४६ या वर्षी या आश्रमाची स्थापना केली. ही संस्था आता जागतिक स्तरावर सन्मानित होणाऱ्या एका केंद्रात रूपांतरित झाली आहे. या आश्रमाद्वारे मानवतेसाठी दिल्या जाणाऱ्या महान सेवेमुळे आज हे छोटेसे गाव संपूर्ण जगात ओळखले जाते. 'निसर्गोपचार आश्रम' ही एक चळवळ आहे, एक तत्त्वज्ञान आहे आणि गांधीजींच्या कालातीत दृष्टिकोनातून प्रेरित झालेली एक जीवनपद्धती आहे. निसर्ग हाच सर्वश्रेष्ठ उपचारक आहे, असा गांधीजींचा दृढ विश्वास होता. नियमित शारीरिक व्यायाम, मानसिक शांतता आणि निसर्गाशी सुसंगत जीवनशैली स्वीकारण्याची प्रेरणा हा आश्रम आपल्याला देतो, असेही ते म्हणाले.

खरे आरोग्य हे गुंतागुंतीच्या वैद्यकीय उपचारांमध्ये नसून साधेपणा, शिस्त आणि निसर्गाशी सुसंवाद साधून जगण्यामध्ये सामावलेले असते अशी गांधीजींची शिकवण होती. त्यानुसार हा आश्रम निसर्गोपचार, योगसाधना तसेच प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेप्रती असलेल्या आपल्या दृढ कटिबद्धतेच्या माध्यमातून हजारो लोकांची सेवा करत आहे. आज संपूर्ण जग जीवनशैलीशी संबंधित आजारांचा सामना करत आहे. मधुमेह, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा आणि तणावाशी संबंधित विकार यांचे प्रमाण आज अत्यंत चिंताजनक वेगाने वाढत आहे. आजकाल प्रत्येकजण तणावाचा सामना करत मर्यादित गरजा आणि निसर्गाशी मेळ साधणाऱ्या जीवनशैलीद्वारे त्यावर मात करता येते, असे श्री. राधाकृष्णन म्हणाले.

आरोग्य म्हणजे केवळ रोगाचा अभाव नव्हे, याची हा आश्रम आपल्याला आठवण करून देतो. आरोग्य ही संपूर्ण शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक स्वास्थ्याची अवस्था होय. साधेपणा, कष्ट आणि प्रामाणिक मार्गाने आपण काम केले, तर आनंद आपोआपच आपल्या मनात प्रवेश करेल आणि आरोग्य चांगले राहील.

आज संपूर्ण जग, आरोग्य आणि स्वास्थ्यासह आधुनिक काळातील विविध आव्हानांवर उपाय शोधण्यासाठी आपल्याकडे आशेने पाहत आहे. जागतिक दृष्टिकोन आता बदलला आहे. केवळ पाश्चात्य वैद्यकशास्त्रच सर्वश्रेष्ठ मानले जात होते, तो काळ आता आपण मागे टाकला आहे. आपल्या पारंपरिक उपचारपद्धती आजारांच्या मुळावर उपचार करतात. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली, भारताने आपल्या पारंपारिक वैद्यकीय पद्धती, योग आणि तत्सम सर्वच क्षेत्रांचे पुनरुज्जीवन होत असून त्यांना जागतिक स्तरावरील मान्यता मिळत आहे. भारत आता 'जागतिक वेलनेस पर्यटनाचे' एक प्रमुख केंद्र म्हणून उदयास येत आहे. या आश्रमासह देशातील निसर्गोपचार केंद्रांमध्ये आजकाल मोठ्या संख्येने परदेशी पर्यटक उपचारांसाठी आवर्जून येत आहेत. आयुर्वेदिक उपचार, सिद्ध, युनानी उपचारपद्धतींना महत्व आले आहे. आज संपूर्ण जग 'योग दिन' साजरा करत आहे. आपण जेव्हा 'विकसित भारत' या संकल्पनेकडे पाहतो, तेंव्हा त्यासोबतच 'निरोगी भारत' असणेही आपल्यासाठी तितकेच आवश्यक ठरते. या प्रवासात आपल्या आश्रमासारख्या संस्थांची भूमिका अधिकच महत्त्वपूर्ण ठरते. निसर्गोपचार आश्रमाचे प्रयत्न आणि राज्य व केंद्र सरकारचे प्रयत्न यांच्या समन्वयातून होणारे कार्य हे हे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेने अत्यंत मोलाचे ठरेल, असे उपराष्ट्रपती म्हणाले.

जेव्हा व्यक्ती निरोगी असतात, तेव्हा कुटुंबे बळकट होतात आणि समाजाची भरभराट होते. तसेच राष्ट्राचा उत्कर्षही होतो. अशा वेळी, 'विकसित भारत २०२७' हे उद्दिष्ट त्याही आधी गाठणे शक्य होते. म्हणूनच, आपण सर्वांनी एकत्रितपणे काम केले पाहिजे. आपल्या सर्वांकडे संयम असणे आवश्यक आहे. आपण आपले मन नेहमीच एका 'प्रवाही' अवस्थेत ठेवले पाहिजे, जेणेकरून ते अधिकाधिक गोष्टी ग्रहण करू शकेल. 'निसर्गोपचार आश्रमा' ही संस्था पुढील पिढ्यांनाही असेच मार्गदर्शन, उपचार आणि प्रेरणा देत राहो, तसेच संपूर्ण मानवतेला संयमाचा धडा शिकवत राहील असा विश्वासही श्री. राधाकृष्णन यांनी व्यक्त केला.

डॉ. नारायण हेगडे यांचे 'आनंदाची रहस्ये' हे पुस्तक आनंदी जीवनाविषयी भाष्य करणारे आहे, असे त्यांनी सांगितले.

राज्यपाल श्री. वर्मा म्हणाले, महात्मा गांधी हे निसर्गोपचाराचे महान पुरस्कर्ते होते. स्वातंत्र्याच्या वर्षी ३३ कोटी लोकसंख्येवरून आपण १४० कोटी लोकसंख्या गाठली असून आयुर्मयादा दुप्पट झाली आहे. आपण अन्नाच्या बाबतीत स्वयंपूर्ण झालो आहे. मात्र, अन्नाची गुणवत्ता, विषयुक्त अन्नामुळे जीवनशैलीशी संबंधित आजारांसह अनेक आजारांचा प्रादुर्भाव वाढला आहे. निसर्गोपचार, आयुर्वेद, योगा, युनानी, आधुनिक उपचारपद्धतीं आपला समृद्ध वारसा आहे. निरोगी भारतासाठी निसर्गोपचार महत्वाचे आहेत. समग्र उपचार पद्धती आज महत्वाची असून निसर्ग हा आजारांवरील महान उपचारक आहे, असेही ते म्हणाले. या संदर्भातील महात्मा गांधी यांचे विचार आजही महत्वाचे आहेत असेही राज्यपाल म्हणाले. निसर्गोपचार आश्रम गेली ८ दशके समाजाची सेवा करीत आहे. पर्यावरण प्रदूषण, व्यसनधीनता आणि अयोग्य आहारामुळे विविध आजार वाढत आहेत. अशा परिस्थितीत देशभरात निसर्गोपचाराचा प्रसार केल्यास रोजगार निर्मिती होण्यासोबत नागरिकांना निरोगी जीवनशैली स्वीकारण्यास प्रोत्साहित करता येईल. विकसित भारताचे स्वप्न निरोगी भारताच्या माध्यमातूनच पूर्ण होऊ शकेल.निसर्गोपचार आश्रमाने विद्यापीठांसोबत समन्वय साधून भारतीय पारंपरिक उपचार पद्धतीचा प्रसार करावा. त्याद्वारे अशा उपचारासाठी कुशल मनुष्यबळ प्राप्त होईल, असे श्री. वर्मा म्हणाले.

शेवटच्या माणसापर्यंत पोहोचणे हे मोठे आव्हान आहे. त्यासाठी हा आश्रम प्रयत्न करत आहे. आश्रमाला परत भेट द्यायला तसेच आश्रमाच्या आदिवासी भागात सुरू असलेल्या कार्याला भेट द्यायला आवडेल असेही राज्यपाल म्हणाले.

राज्यसभेचे उपसभापती हरिवंश नारायण सिंह म्हणाले, देशाला आत्मनिर्भर बनविण्यात स्वदेशी उपचारपद्धती महत्वाची आहे. त्यामुळे केंद्र सरकारने २०१४ नंतर केंद्र सरकारनेदेखील म.गांधीजींच्या या आश्रमासारख्या प्रयोगांचा विस्तार करण्याच्या कामाला वेग दिला आहे. केंद्राने आयुष मंत्रालयाची स्थापना केली असून प्रत्येक वर्षी मंत्रालयाची आर्थिक तरतूद ४ हजार ४०० कोटीहून अधिक आहे.

जगात रोगोपचार खर्चिक होत असतांना सेवाभाव ही या आश्रमाची विशेषतः आहे. इथली कार्यपद्धती लक्षात घेतल्यास त्यात महात्मा गांधीजींच्या विचारांचा सुगंध दरवळतो आहे असे म्हणता येईल. माती, पाणी, ऊन, हवा या माध्यमांतून या ठिकाणी उपचार होत आहेत. इथली शिस्त इतरांनाही मार्गदर्शक आहे. साधे जीवन, स्वयंशिस्त आणि निसर्गाचा सन्मान करीत गांधीजींना अभिप्रेत असलेली आनंदी जीवनशैली स्वीकारता येईल, असे त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, निसर्गोपचार आश्रम केवळ एक आरोग्य केंद्र नसून जीवन जगण्याचा महत्वपूर्ण मार्ग आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या प्रेरणेतून स्थापन झालेला हा आश्रम नैसर्गिक उपचारपद्धतीच्या माध्यमातून आरोग्य, स्वावलंबन आणि साधेपणाच्या जीवनाचा संदेश देतो. केवळ आजारांवरील उपचार नव्हे तर सुदृढ जीवनशैली आणि निसर्गासोबत संतुलन राखण्याची प्रेरणा देखील देत आहे. निसर्ग आणि महात्मा गांधी यांचे अतूट नाते होते. ग्रामीण भागाचा विकास हा त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू होता. भारताचा खरा आत्मा गावात वसतो, या विचारावर त्यांचा ठाम विश्वास होता. म्हणूनच त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात ग्रामीण उन्नती, स्वावलंबन आणि साधेपणाचा मार्ग स्वीकारला आणि समाजासमोर आदर्श निर्माण केला.

निसर्गाच्या सानिध्यात प्रत्येक आजार बरा करण्याची ताकद असते, हा गांधीजींचा संदेश आजही मार्गदर्शक आहे. या विचारांची प्रत्यक्ष अंमलबजावणी उरळी कांचन निसर्गोपचार आश्रम येथे पाहायला मिळते. गांधीजींचे हे विचार केवळ आरोग्यापुरते मर्यादित नाहीत, तर ते साधेपणा, स्वावलंबन आणि ग्रामीण विकासाचा व्यापक संदेश देणारे आहेत. 'खेड्याकडे चला' हा त्यांचा संदेश आजही तितकाच कालसुसंगत आहे, असेही त्या म्हणाल्या. डॉ. हेगडे यांनी प्रास्ताविकात आश्रमाची माहिती दिली. ते म्हणाले, राष्ट्रपिता महात्मा गांधी हे याच दिवशी १९४६ येथे आले आणि सहकाऱ्यांच्या मदतीने निसर्गोपचार आश्रम स्थापन केला व स्थानिकांवर निसर्गोपचार केले. येथे आश्रमाचे तत्कालीन संस्थापकांनी आश्रमाच्या विस्तारासाठी प्रयत्न केले. तसेच येथील शेतकऱ्यांसाठी गाईंच्या वंशसुधारासाठी प्रयत्न केले.

यावेळी श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त डॉ. देखणे यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ. हेगडे लिखित 'आमच्या आनंदाचे रहस्य' अर्थात 'सिक्रेट्स ऑफ आवर हॅपीनेस' या पुस्तकाचेही यावेळी प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाला आश्रमाचे विश्वस्त, वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, नागरिक उपस्थित होते.

# तुर्की मधच्या नावाखाली लाखोंची लूट; भोंदूबाबा अशोक खरातचा नवा घोटाळा उघड

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात दररोज नवे धक्कादायक खुलासे होत असून, आता त्याच्या आर्थिक फसवणुकीचे आणखी धागेदोरे समोर आले आहेत. चिंचुके, बनावट खडे यानंतर आता तुर्की मध विक्रीच्या नावाखालीही भक्तांची मोठ्या प्रमाणात फसवणूक केल्याची माहिती तपासातून पुढे आली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, अशोक खरात तुर्की मध कामोत्तेजक आणि शक्तिवर्धक असल्याचा दावा करत असे. विशेषतः लैंगिक अडचणींवर उपाय म्हणून हा मध प्रभावी असल्याचे सांगून तो अनेक उद्योजक आणि राजकीय नेत्यांना महागड्या दरात विकत होता. धक्कादायक बाब म्हणजे, एका किलो मधाची बाटली तब्बल ९ लाख रुपयांना विकली जात असल्याची माहिती समोर आली आहे.



खरात या मधाला एल्विश हनी असे नाव देत असे आणि तो तुर्कीतील समुद्राच्या खोल गुहांमधून मिळतो, असा दावा करत होता. या कथित दुर्मिळतेमुळेच मधाची किंमत प्रचंड असल्याचे सांगून तो भक्तांचा विश्वास संपादन करत असे. मात्र, हा सगळा प्रकार बनावट असल्याचा संशय तपासात व्यक्त केला जात आहे.

या माध्यमातून मिळालेली कोट्यवधींची रक्कम खरात आपल्या ट्रस्टच्या नावावर जमा करत असल्याचेही समोर आले आहे. या व्यवहारांद्वारे काळा पैसा पांढरा करण्याचा प्रकार (मनी लॉन्डरिंग) झाल्याचा संशय तपास यंत्रणांनी व्यक्त केला आहे. चिंचोके, खडे, तांत्रिक विधी आणि महागडे मध, अशा विविध माध्यमांतून अशोक खरातने लोकांच्या अंधश्रद्धेचा आणि वैयक्तिक अडचणींचा गैरफायदा घेत मोठे आर्थिक जाळे उभे केले असल्याचे स्पष्ट होत आहे.

दरम्यान, अशोक खरात विरोधात एकूण ६ गुन्हे दाखल झाले असून नव्याने ३ तक्रार दाखल झाल्या आहेत. भोंदू अशोक खरात विरोधात दाखल तक्रारीत एका विद्यार्थिनीचा देखील समावेश आहे. नराधम अशोक खरातने विद्यार्थिनीशी गैरवर्तन केल्याचे उघडकीस आले आहे. धार्मिक विधी, लग्न जमवून देणे, पूजाविधी, भविष्य सांगणे अशा वेगवेगळ्या बहाण्याने अशोक खरातने महिलांवर अत्याचार केलेत. अशोक खरातच्या पोलीस कोठडीची मुदत आज संपणार असून त्याला आज कोर्टात हजर केले जाणार आहे. आज न्यायालयात पोलिसांकडून काय बाजू मांडली जाते आणि पोलीस कोठडीत किती वाढ होते? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.




# टीबीमुक्त भारतासाठी १०० दिवसांची विशेष मोहीम; राज्यात व्यापक अंमलबजावणी

**मुंबई । प्रतिनिधी**

भारत सरकारतर्फे जागतिक क्षयरोग दिन २०२६ निमित्त टीबी मुक्त भारत अभियान - १०० दिवसांची विशेष मोहीम २४ मार्चपासून देशभरात राबविण्यात येणार असून, महाराष्ट्रातही या मोहिमेची व्यापक अंमलबजावणी करण्यात येणार आहे.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर, राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या पुढाकाराने ही मोहीम राज्यातील सर्व जिल्हे व शहरी भागांमध्ये राबविण्यात येणार आहे.

या मोहिमेअंतर्गत एआय आधारित व्हलनरेबिलिटी मॅपिंगद्वारे निवडण्यात आलेल्या ११,०९१ जोखीमग्रस्त गावे व शहरी वॉर्डमध्ये विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे. पारंपरिक लक्षणांवर आधारित तपासणीऐवजी जोखीमग्रस्त लोकसंख्येची सक्रीय तपासणी करण्यावर भर देण्यात येणार आहे. नि-क्षय पोर्टलवरील एआय विश्लेषणाच्या आधारे सूक्ष्म नियोजन व रूट मॅपिंग करण्यात आले असून, वृद्ध, मधुमेही, कुपोषित, पीएलएचआयव्ही, क्षयरुग्णांचे संपर्क, स्थलांतरित व झोपडपट्टीतील नागरिकांची १००% तपासणी सुनिश्चित केली जाणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित हाताने वापरता येणारे क्ष-किरण यंत्रणांद्वारे जलद तपासणी करून संशयित रुग्णांना तत्काळ एनएएटी चाचणीसाठी पाठविण्यात येणार आहे. दुर्गम व आदिवासी भागांमध्ये नि-क्षय मोबाईल युनिटद्वारे सेवा पोहोचविण्यात येतील.

या मोहिमेत आयुष्मान आरोग्य शिबिरांद्वारे क्षयरोगासोबतच मधुमेह, उच्च रक्तदाब, ॲनिमिया व कुपोषण यांसारख्या आजारांची एकत्रित तपासणी करण्यात येणार आहे. जिल्हास्तरावर विविध विभागांचा समन्वय साधत रुग्णांना सेवा दिली जाणार आहे. लोकप्रतिनिधी, स्वयं सहाय्यता गट, माय भारत स्वयंसेवक, स्वयंसेवी संस्था व शैक्षणिक संस्थांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्यात येणार असून, नि-क्षय मित्र उपक्रमाद्वारे रुग्णांना पोषण व मानसिक आधार दिला जाणार आहे.

या १०० दिवसांच्या कालावधीत प्रत्येक उच्च-जोखीम क्षेत्रात आयुष्मान आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात येणार असून, राज्य, जिल्हा व तालुका स्तरावर अभियानाचा शुभारंभ करण्यात आला आहे. दिवसनिहाय व गावनिहाय सूक्ष्म नियोजन तयार करण्यात आले आहे. संपूर्ण मोहिमेचे रिअल-टाइम संनियंत्रण नि-क्षय पोर्टलद्वारे करण्यात येणार असून, जिल्हा व राज्य स्तरावर नियमित आढावा घेतला जाणार आहे. या मोहिमेमुळे क्षयरुग्णांचा लवकर शोध, वेळेत उपचार, उपचारातील सातत्य आणि मृत्यूदरात घट साध्य होण्यास मदत होणार आहे. राज्यात क्षयरोग निर्मूलनाच्या दिशेने ही मोहीम एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार असल्याचा विश्वास आरोग्य विभागाने व्यक्त केला आहे.

## थोडक्यात

### 'पल्स वैद्यकीय परिषद' ठरणार महत्त्वपूर्ण - मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी

**मुंबई । प्रतिनिधी**

आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ग्रामीण भागापर्यंत दर्जेदार वैद्यकीय सुविधा पोहोचविण्याच्या दिशेने महाराष्ट्राने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून, 'पल्स वैद्यकीय परिषद' या आंतरराष्ट्रीय व्यासपीठाद्वारे राज्याच्या आरोग्य क्षेत्राला नवी दिशा मिळणार आहे. जिओ कन्व्हेन्शन सेंटर येथे २७ व २८ मार्च २०२६ रोजी आयोजित या परिषदेच्या नियोजनासाठी चोख तयारी करण्याचे निर्देश मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांनी दिले. मंत्रालयात झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

या परिषदेत विविध देशांतील नामांकित तज्ज्ञ, संशोधक, उद्योगपती आणि धोरणकर्ते सहभागी होणार असून, आरोग्य क्षेत्रातील नव्या संधी आणि तंत्रज्ञानाचा लाभ राज्याला मिळणार आहे. सुमारे ३० संस्थांसोबत सामंजस्य करार होणार असल्याने आरोग्य सेवा, संशोधन आणि वैद्यकीय शिक्षण क्षेत्राला मोठी चालना मिळणार आहे.

आयुर्वेद आणि लोपॅथी पद्धतींचा समन्वय साधून एकात्मिक आरोग्य व्यवस्था उभारण्यावर या परिषदेत विशेष भर दिला जाणार आहे. यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत आधुनिक व सर्वसमावेशक आरोग्य सुविधा पोहोचविण्यास मदत होणार आहे.

या व्यासपीठावर आरोग्य सेवा, वैद्यकीय शिक्षण, संशोधन, औषधनिर्मिती उद्योग, स्टार्टअप आणि वेलनेस पर्यटन या क्षेत्रातील घटक एकत्र येणार असून, नव्या कल्पना आणि सहकार्याच्या संधी निर्माण होणार आहेत. परिणामी रुग्णांना अधिक चांगल्या सुविधा, डॉक्टरांना नव्या संधी आणि विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण व संशोधनाचा अनुभव मिळणार आहे. परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी वैद्यकीय शिक्षण विभाग, एमएमआरडीए, उद्योग विभाग, मुंबई महानगरपालिका, आरोग्य विभाग तसेच विविध संस्थांचे समन्वयाने नियोजन सुरू असून, ही परिषद महाराष्ट्राच्या आरोग्य क्षेत्राला आंतरराष्ट्रीय पातळीवर नवे स्थान मिळवून देणारी ठरणार आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

### राम कंद म्हणून विकला जातोय विदेशी वनस्पती घायपातचा मांसल बुंधाचे खोड

**सोयगाव । प्रतिनिधी**

चैत्र महिन्यात महाराष्ट्रात गावोगावी यात्रा भारतात. याच महिन्यात श्रीराम नवमी ही असते. या यात्रात, बाजारात, रस्त्यावर भला मोठा राम कंद विकणारे काही जण असतात. हे लोक सदर कंद केरळ किंवा हिमालयातून तो आणला असे भासवतात. वास्तविक बघता असा कोणताही राम कंद नावाचा वन स्पती कंद देशात आजवर आढळला नाही. जो विकला जातो तो मोठ्या उंचीत वाढलेल्या घायपात नावाच्या विदेशी वनस्पती च्या बुंध्याचा खोडाचा भाग आहे.घायपात जिचे शास्त्रीय नाव आगावा सिसालाना( रसरीं ठिशश्ररप )असे असून ही झुडुप वर्गीय प्रजाती बांधावर विशेषतः वनविभागाने जमिनीची धूप होऊ नये म्हणून देशातील विविध वन क्षेत्रात, डोंगर उतारावर बऱ्याच ठिकाणी लावली आहे. या घायपातचे थोडे आखुड व जाड असते. खोडाची वरची साल खरवडून त्यास गुळगुळीत केले जाते.त्यावर काथ व पाणी याचा मुलामा देवून तपकिरी रंग आणला जातो. त्यास वरच्या बाजूस काप, छिद्र करून त्यात साखरेचे पाणी मुरवले जाते. अशा प्रकारे किंचित गोड चवीचा कंद आता ४० ते ५० रु. चकती सारखा कापून विकला जातो अशी माहिती पर्यावरणाचे अभ्यासक डॉ. संतोष पाटील यांनी दिली आहे. घायपात हे विदेशी वनस्पती असून ती अगदी अलीकडे देशात रोपण करण्यात सुरुवात झाली असून तिचा रामायणसी कसलाही संबंध नाही. या खोडात ऑक्सालेटचे क्षार अधिक असतात, त्यामुळे घसा खवखवणे, सुजने आदी त्रास ही बऱ्याच जणांना होतो. श्रीरामांच्या काळात आपला हा भाग दंडकारण्यात समाविष्ट होता, त्याकाळी विपुल वन संपदा होती, अनेक औषधी वनस्पती,शक्तीवर्धक कंद मुळे, फळे नक्कीच होती व वनवास काळात हाच त्यांना निसर्गाचा आधार लाभला.हे निसर्ग वैभव व ते दंडकारण्य आता नामशेष झाले आहे. कोल्हापूर मध्ये नुकतेच कंद मुळाचे प्रदर्शन भरवले होते त्यात या घायपातच्या कंदावर प्रकाश टाकून वास्तव मांडण्यात आले होते.

# भोंदूबाबा प्रकरणात मोठा ट्विस्ट; जयंत पाटीलांवर सहआरोपी करण्याची मागणी

**नाशिक । प्रतिनिधी**



नाशिक येथील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाने राज्यात खळबळ माजली आहे. कित्येक महिलांवर लैंगिक अत्याचार, बलात्कार केल्यानंतर त्याच्या विरोधात तक्रार दाखल करण्यात आली. या प्रकरणाने आता राजकीय वर्तुळात देखील मोठी खळबळ उडाली आहे. भाजप आमदार गोपिचंद पडळकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री जयंत पाटील यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. पडळकरांच्या मते, जयंत पाटील यांनी अशोक खरातशी निकटचे संबंध ठेवले होते आणि त्याला विविध प्रकारे मदत केली होती.

रक्ताची अंघोळ: जयंत पाटील आपल्या मुलासोबत मिरगाव येथे खरातकडे गेले होते. तेथे त्यांनी रक्ताची अंघोळ केल्याचा दावा पडळकरांनी केला आहे. या प्रकरणाची सखोल पोलीस चौकशी व्हावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

ईश्वरपूर कार्यक्रम: जयंत पाटील यांनी अशोक खरातला ईश्वरपूर येथे आणले होते. तेथे खरातने काय कार्यक्रम केले, याचीही चौकशी व्हावी, असे पडळकर म्हणतात. दारणा धरणातील पाणीपुरवठा: खरातच्या घर आणि संस्थेला दारणा धरणातून ४० किलोमीटर लांबीची पाईपलाइन आणि पाणी देण्यात आले. जयंत पाटील तेव्हा जलसंपदा मंत्री होते. त्यामुळे या निर्णयामागे त्यांची भूमिका तपासावी, अशी मागणी पडळकरांनी केली आहे.

पडळकर यांनी स्पष्टपणे सांगितले की, भोंदू बाबाचा सगळा चांगला कार्यक्रम हा मुख्यमंत्री यांनी केला आहे, पण जयंत पाटील यांनी खरातकडे जाऊन काय केले, याची माहिती समोर यायला हवी. तसेच जयंत पाटील यांना या प्रकरणात सहआरोपी करण्यात यावे, अशीही मागणी त्यांनी केली. अशोक खरातवर लैंगिक अत्याचार, भोंदूगिरी आणि महिलांचा छळ यासह अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्याला अटक झाल्यानंतर त्याचे राजकीय आणि प्रशासकीय कनेक्शन्स समोर येत आहेत. यापूर्वी खरातच्या कार्यक्रमांना अनेक नेत्यांनी हजेरी लावल्याचे फोटो आणि व्हिडिओ व्हायरल झाले आहेत. आता गोपिचंद पडळकर यांच्या आरोपांमुळे जयंत पाटील यांच्याही नावाने चर्चा सुरू झाली आहे.

भाजप आमदार गोपिचंद पडळकर यांनी केलेल्या या आरोपांमुळे महाराष्ट्राच्या राजकारणात नवी चर्चा सुरू झाली आहे. या प्रकरणाची ख्वद किंवा पोलीस स्तरावर सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. जयंत पाटील यांच्याकडून या आरोपांना अद्याप प्रत्युत्तर मिळालेले नाही. हे आरोप खरे ठरले तर खरात प्रकरण आणखी मोठ्या राजकीय भूकंपाचे कारण ठरू शकते. सध्या प्रकरण तापलेले असून, सर्वांच्या नजरा पोलीस तपास आणि नेत्यांच्या प्रतिक्रियांकडे लागल्या आहेत.

# 'लोन थकीत' सांगत लुटीचा प्रयत्न



**मुंबई । प्रतिनिधी**

जुना पुणे-मुंबई महामार्गावर लोणावळ्याजवळ कार चालकांना टार्गेट करणारी एक धक्कादायक टोळी सक्रिय झाली असून, बनावट बँक लोनचा बहाणाकरून लूट करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे समोर आले आहे. एका जागरूक कार चालकाने प्रसंगावधान राखल्यामुळे मोठा अनर्थ टळला आहे.

दरम्यान, संबंधित चालकाने काही दिवसांपूर्वीच उरी २४कडून जुनी ह्युंदाई व्हेरना कार खरेदी केली होती. लोणावळ्याजवळून जात असताना दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात व्यक्तींनी त्यांचा पाठलाग केला.

एका निर्जन ठिकाणी या व्यक्तींनी चालकाला जबरदस्तीने गाडी थांबवण्यास भाग पाडले. गाडी थांबवताच, या कारवर आयसीआयसीआय बँकेचे १० लाख रुपयांचे कर्ज थकीत आहे, असा दावा करत या तरुणांनी चालकावर दबाव टाकण्यास सुरुवात केली. तसेच कार ओढून नेण्याची धमकी देऊन ते चालकाला बाहेर येण्यास सांगत होते. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून चालकाने गाडीचा दरवाजा उघडला नाही किंवा काचही पूर्ण खाली केली नाही. त्याने तातडीने पोलिसांशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला.

अशातच, पोलीस येत असल्याचे समजताच संशयित आरोपींनी तेथून पळ काढला. नंतर पडताळणी केली असता, गाडीवर कोणतेही कर्ज थकीत नसल्याचे स्पष्ट झाले आहे. हा सर्व प्रकार कारच्या डॅश बोर्डवर असलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झालाय. मात्र या प्रकरणी कार चालकाने कोणतीही फिर्याद लोणावळा पोलिसांत दिली नसल्याने, उपलब्ध सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या आधारे अशी कोणती घटना घडली आहे का याचा तपास लोणावळा शहर पोलीस निरीक्षक राजेश रामाघरे करत आहेत.

# मारहाण प्रकरणावर सुप्रिया सुळेंचा संताप: लोकशाहीची हत्या, चौकशी झालीच पाहिजे!

**सातारा । प्रतिनिधी**



सातार्यातील प्रकरण राज्यभर चर्चेत आहे. पालकमंत्री शंभुराज देसाई यांना भाजपाच्या मंत्र्यांकडून थेट रस्त्यावर मारहाण करण्यात आली. काल शिवसेना शिंदे गटाचे आमदार यादरम्यान आक्रमक झाले आणि त्यांनी थेट विधीमंडळाच्या पायऱ्यांवर आंदोलन केले. यावरून आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी मोठे विधान केले. सुप्रिया सुळे यांनी शंभुराज देसाई यांना झालेल्या मारहाणीचा निषेध केला. शंभुराज देसाई काल विधीमंडळात जे बोलले ते धक्कादायक होते, असेही सुप्रिया सुळे यांनी म्हटले. पुढे बोलताना सुप्रिया सुळे यांनी म्हटले की, एका कॅबिनेट मंत्र्याला मारहाण कशी होते? या घटनेचा निषेध आहे. कोणाच्याही मनमर्जीने हा देश चालणार नाही. हा देश डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानानेच चालणार. हा पोलिसांचा संबंध नाही. त्याठिकाणी असलेल्या पोलिसांच्या मागे जी शक्ती होती ती त्या अदृश्यशक्तीचा ताकद आहे. हे पोलिसांना करायला लावले नाही तर महाराष्ट्रातील पोलिस असे करणारच नाहीत, असा माझा विश्वास आहे.

पुढे सुप्रिया सुळे यांनी म्हटले की, मी मुख्यमंत्र्यांना याबद्दलचे पत्र लिहिणार आहे. काल मी भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांसोबत याबाबत चर्चा केली. कारण दिल्लीतील वर्तमान पत्रांमध्ये काही बातम्या आल्या आहेत. पण महाराष्ट्रासाठी हे दुर्दैव आहे, जी काही सातार्याच घटना झाली. लोकशाहीची हत्या आहे. हा मोठा भाऊ आणि छोटा भाऊ असा विषयच नाहीये. ही लोकशाही आहे आणि लोकशाहीत अशी गुंडागर्दी होणार असेल तर त्याच्यापुढे ताकदीने लढण्याची गरज आहे. आज हा सातार्याचा विषय आहे. उद्या परत १० ठिकाणी होईल, मुळात म्हणजे असे करणेच चुकीचे आहे. मी शंभूराजेंनाही फोन करणार आहे आणि मी मकरंद पाटलांना फोन करून अगोदरच सर्व माहिती घेतली आहे.

पुढे बोलताना सुप्रिया सुळे यांनी म्हटले की, शंभुराज देसाई आणि मकरंद पाटलांना धक्काबुक्की झाली असेल तर याची चौकशी व्हायला पाहिजे, दोघेही कॅबिनेट मंत्री आहेत. म्हणजे ज्या सरकारमध्ये तुम्ही आहात तेच सरकार तुम्हाला धक्काबुक्की करतंय. पाडुरंगा काय दिवस बघायला मिळत आहेत, महाराष्ट्रामध्ये. तेही मित्र पक्षांनाच ते त्यांचे मित्र पक्षच आहेत ना? असेही सुप्रिया सुळे यांनी म्हटले.

# सुषमा अंधारेंचा चाकणकर-तटकरेंवर निशाणा

**मुंबई । प्रतिनिधी**



महाराष्ट्रात सध्या भोंदू बाबा अशोक खरातचे प्रकरण चांगलेच गाजत आहे. या प्रकरणी सध्या अनेक राजकीय आरोप-प्रत्यारोप होताना दिसत आहेत. त्यातच आता ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या नेत्या रुपाली चाकणकर आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यावर बोचरी टीका केली आहे.

रुपाली चाकणकर यांच्या बोटाला झालेली जखम आणि सुनील तटकरे यांच्या बोटाला झालेल्या जखमेवरुन सुषमा अंधारेंनी निशाणा साधला आहे. सुषमा अंधारे यांनी हा किती मोठा योगायोग असा टोला लगावला आहे. अध्यात्म आणि तंत्र-मंत्राच्या नावाखाली महिलांचे लैंगिक शोषण आणि भाविकांची आर्थिक लूट करणाऱ्या अशोक खरातचे काळे कारनामे उघड झाले आहेत. या भोंदू बाबाचे अनेक बड्या नेत्यांशी संबंध असल्याचे बोलले जात आहे. त्यातच रुपाली चाकणकर या अशोक खरातला गुरु मानत असल्याचा आरोप झाल्यानंतर वादाला आणखी पेव फुटले. यानंतर रुपाली चाकणकर यांच्या तर्जनीच्या बोटाला जखम झाल्याचे फोटो समोर आले होते. तशाचप्रकारे सुनील तटकरे यांचेही फोटो व्हायरल झाले होते. यावरुन सुषमा अंधारे यांनी तर थेट चाकणकर या तंत्र-मंत्र विद्या करायच्या असा आरोप चाकणकरांवर केला होता.

आता यावर सुषमा अंधारे यांनी एक ट्वीट केले आहे. त्यात त्यांनी एक व्हिडीओ पोस्ट केला आहे. याद्वारे त्यांनी जोरदार टीका केली आहे. अध्यक्षपदावरुन पायउतार झाल्यानंतर रुपाली चाकणकरांना तब्बल ४ दिवसांनी नेमकं त्यांच्या अनामिकेला काय झालं होतं, त्याचं कारण आता सुचलेले आहे. त्यांचं व्हॉटसअॅप स्टेटस आणि बातम्या या सर्व गोष्टींवरुन जाणवतंय की म्हणे त्यांच्या अनामिकेला दरवाज्यात अडकल्याने जखम झाली. साधारण दरवाज्यात माणसाचा अंगठा, तर्जन किंवा करंगळी अडकू शकते. मला जेवढं काही त्यांच्यातलं कळत त्यानुसार, असे सुषमा अंधारे म्हणाल्या.

पण काय योगायोग की चाकणकरांच्या अनामिकेला दरवाजामुळे जखम झाली. आताच राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी पत्रकार परिषद घेतली. त्यांनी सांगितलं की त्यांच्या तर्जनीला सुद्धा दरवाज्यात अडकल्यामुळेच जखम झाली. एकूण काय, हातातले गंडेदोरे काय, ईशान्येश्वराची पूजा काय, बोटाला होणारी जखम काय आणि नेमकी ती जखम दरवाजात अडकून होते, हा सर्वच किती योगायोग आहे. कमाल आहे, असा टोलाही सुषमा अंधारेंनी लगावला.

चाकणकरांचा कार्यकर्ता सांगत आहे की ताईंच्या दरवाज्यात बोट अडकून जखम झाली. ताई आमच्याकडे त्यादिवशी आरतीला आल्या होत्या पण काय गंमत आहे की चाकणकर स्वतः सांगतात दोन तारखेला त्या अजितदादांच्या दौऱ्यामध्ये होत्या काय खरं काय खोटं ईशान्येश्वराला आणि खरातांनाच माहिती.. पण हा किती मोठा योगायोग आहे की तटकरेंच्या बोटाला झालेली जखम सुद्धा दरवाजात अडकूनच झाली, असेही सुषमा अंधारेंनी ट्वीट करताना म्हटले आहे. त्यामुळे आता याप्रकरणी विविध चर्चांना उधाण आले आहे.

# 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या शहीदी समागमानिमित्त जाणाऱ्या भाविकांसाठी सुयोग्य नियोजन केल्याबद्दल महापौर रवि लांडगे यांचा करण्यात आला सन्मान

**पिंपरी । प्रतिनिधी**



'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागमासाठी पिंपरी चिंचवड शहरातून जाणाऱ्या भाविकांना चांगल्या सोयीसुविधा देण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने सुयोग्य नियोजन करण्यात आले होते. त्याबद्दल पिंपरी गुरुद्वारा व देहूरोड गुरुद्वारा यांच्या वतीने महापौर रवि लांडगे यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी सुरिंदर सिंग, गुरविंदर सिंग, गुरुचरण सिंग, लखविंदर सिंग, गोविंद सिंह यांच्यासह पिंपरी गुरुद्वारा व देहूरोड गुरुद्वारा चे पदाधिकारी, नागरिक तसेच कार्यक्रमाच्या आयोजनात योगदान देणारे कार्यकर्ते उपस्थित होते. श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागमाचे औचित्य साधून २८ फेब्रुवारी व शनिवार १ मार्च २०२६ रोजी नवी मुंबई येथील खारघर परिसरात भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या समागमास पिंपरी चिंचवड शहरातील विविध समाजघटकांतील भाविक मोठ्या संख्येने गेले होते. पिंपरी चिंचवड शहरातून जाणाऱ्या भाविकांच्या प्रवासादरम्यान कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने सुयोग्य नियोजन करण्यात आले होते. त्यामध्ये वाहतूक नियोजन, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, वैद्यकीय सहाय्य तसेच आवश्यक समन्वयात्मक उपाययोजना करण्यासाठी महापौर रवि लांडगे यांनी महापालिकेच्या विविध विभागांना सूचना दिल्या होत्या. या नियोजनाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत महापौर रवि लांडगे यांचा आज सन्मान करण्यात आला. यावेळी महापौर रवि लांडगे म्हणाले, 'श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांनी मानवतेच्या रक्षणासाठी दिलेले बलिदान हे सर्व समाजासाठी प्रेरणादायी आहे. अशा पवित्र समागमासाठी जाणाऱ्या भाविकांना सुरक्षित व सुलभ प्रवास अनुभव मिळावा, ही महापालिकेची जबाबदारी आहे. सर्व विभागांच्या समन्वयातून हे नियोजन यशस्वीरीत्या पार पडले, याचा आनंद आहे.'

# मच्छीमारांना स्वावलंबी बनविण्यासाठी शासन प्रयत्नशील - मस्त्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे

**मुंबई । प्रतिनिधी**



राज्यातील मच्छीमारांना आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि स्वावलंबी बनविण्यासाठी मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेसह शासन विविध योजनांच्या माध्यमातून प्रयत्नशील आहे, अशी माहिती मस्त्यव्यवसाय व बंदरे मंत्री नीतेश राणे यांनी दिली.

मंत्रालय येथे मच्छीमारांच्या प्रश्नांबाबत विविध मच्छीमार संस्थांच्या प्रतिनिधींसोबत आयोजित बैठकीत मत्स्यव्यवसाय मंत्री श्री. राणे बोलत होते. यावेळी मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव रामास्वामी एन, महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश खपले,राष्ट्रीय मत्स्य विकास मंडळाचे सदस्य प्रकाश एम. लोणारे तसेच विविध मच्छीमार संस्थांचे प्रतिनिधी आणि संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

मंत्री नितेश राणे यांनी सांगितले की, पारंपरिक मासेमारीसोबतच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवून उत्पादनक्षमतेत वाढ करणे हा शासनाचा मुख्य उद्देश आहे. त्यासाठी मच्छीमारांना अत्याधुनिक बोटी, जाळी, तसेच कोल्ड स्टोरेज सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात आहे.तसेच, मत्स्य व्यवसायासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण, कर्ज सुविधा आणि अनुदान योजनाही अधिक प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. किनारपट्टी भागातील पायाभूत सुविधांचा विकास, बंदरांचे आधुनिकीकरण आणि मत्स्य प्रक्रियेसाठी उद्योग उभारणी यावरही शासन लक्ष केंद्रित करत आहे.

मच्छीमारांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्यांचे जीवनमान उंचावणे हे सरकारचे प्रमुख ध्येय आहे. युवकांनी गोड्या पाण्यातील मत्स्य व्यवसायाकडे वळावे, यासाठी ही विविध प्रोत्साहनपर योजना राबवल्या जात आहेत. शासनाच्या या उपक्रमांमुळे राज्यातील मच्छीमार समुदाय अधिक सक्षम होईल आणि मत्स्य व्यवसायाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# नोकरीच्या आमिषाने महिलेवर अत्याचार, पतीची १० लाखांची फसवणूक

**मुंबई । प्रतिनिधी**

डोंबिवली शहरात माणुसकीला काळिमा फासणारी एक अत्यंत धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. स्वतःची ओळख लपवून तीन वेगवेगळ्या नावांनी वावरणाऱ्या एका नराधमाने रेल्वेमध्ये नोकरी लावण्याचे आमिष दाखवून एका महिलेवर वारंवार बलात्कार केला. इतकेच नाही, तर तिच्या पतीला रेल्वेचे कंत्राट मिळवून देतो असे सांगून १० लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याची गंभीर घटनाही समोर आली आहे.

रहीम पद्मसी उर्फ करीम मोहंमद जैन उर्फ करण जोशी असे या आरोपीचे नाव असून तो शहरात आपली खरी ओळख लपवून वावरत होता. आरोपीने पीडित महिलेला रेल्वेत नोकरी लावण्याचे प्रलोभन देऊन आपल्या घरी बोलावले. तिथे तिला गुंगीचे औषध देऊन तिच्यावर बलात्कार केला. यानंतर तिचे आक्षेपार्ह व्हिडीओ आणि फोटो काढले. हे फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देऊन त्याने अनेक वर्षे पीडितेवर लैंगिक अत्याचार केले.

हा नराधम केवळ लैंगिक शोषणापुरता मर्यादित राहिला नाही, तर त्याने पीडितेच्या पतीलाही आपल्या जाळ्यात ओढले. रेल्वेचे मोठे कंत्राट मिळवून देतो असे सांगून त्याने पतीकडून वेळोवेळी १० लाख रुपये उकळले. जेव्हा पतीला आपली फसवणूक होत असल्याचे लक्षात आले. त्याने पत्नीशी याबद्दल चर्चा केली, तेव्हा पत्नीने आपल्यावर होत असलेल्या अत्याचाराचा पाढा वाचला. हे ऐकून पतीला मोठा मानसिक धक्का बसला.

यावेळी तपासादरम्यान या प्रकरणातील आणखी एक भीषण पैलू समोर आला आहे. आरोपी हा व्याजावर पैसे देण्याचा बेकायदा धंदा करतो. अनेक गरजू महिलांना त्याने पैसे दिले होते.



मात्र, व्याजाची वसुली करण्याऐवजी तो महिलांकडून शरीरसुखाची मागणी करायचा, असा आरोप काही महिलांनीही केला आहे. या त्रासाला कंटाळून आता अनेक महिला पोलीस ठाण्यात तक्रार करण्यासाठी पुढे येत आहेत.

याप्रकरणी ८ मार्च रोजी रामनगर पोलीस ठाण्यात या संदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होताच आरोपी फरार झाला. त्याने अटकेपासून वाचण्यासाठी कल्याण जिल्हा सत्र न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता. मात्र, फिर्यादीचे वकील महेश शिवदास यांनी न्यायालयात मांडलेला प्रभावी युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीचा जामीन अर्ज फेटाळून लावला आहे. रामनगर पोलीस आता या त्रिनामी नराधमाचा कसून शोध घेत आहेत.

## संक्षिप्त

### वाशीत २४ मार्च ते ४ एप्रिल या कालावधीत'महालक्ष्मी सरस २०२६'चे आयोजन

**मुंबई । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा आणि त्यांच्यातील कलागुणांचा सन्मान करण्यासाठी महाराष्ट्र राज्याच्या ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्या उमेद अभियानामार्फत आयोजित 'महालक्ष्मी सरस २०२६' या प्रदर्शन नवी मुंबईतील वाशी येथील सिडको एक्झिबिशन सेंटर येथे २४ मार्च ते ४ एप्रिल २०२६ या कालावधीत सकाळी दहा ते रात्री दहा या वेळेत हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले असून ते विनामुल्य असणार आहे.

या प्रदर्शनाचे मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे राज्यातील दुर्गम भागातून आलेल्या महिला बचत गटांच्या ग्रामीण भगिनींच्या कौशल्यपूर्ण आणि दर्जेदार उत्पादनांना राज्यस्तरीय व्यापक बाजारपेठेत विक्रीची संधी प्राप्त होते. या महिलांनी आपल्या मेहनतीने आणि जिद्दीने तयार केल्याल्या या उत्पादनांना नेहमीच मोठ्या प्रमाणात ग्राहकांची पसंती मिळत आली आहे. राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांनी नागरिकांनी या प्रदर्शनाला आर्वजून भेट देऊन महिला बचत गटांच्या कौशल्यपूर्ण दर्जेदार उत्पादनांना प्रोत्साहन देत ग्रामीण महिलांच्या कष्टकरी प्रवासाला साथ देण्याचे आवाहन केले आहे.

यावर्षीचे प्रदर्शन अधिक भव्य आणि सुसज्ज करण्यात आले असून, यामध्ये एकूण ४९० स्टॉल्सचा समावेश आहे. खवय्यांसाठी विशेष आकर्षण म्हणजे यात १०० फूड स्टॉल्स लावण्यात आले आहेत, जिथे अस्सल ग्रामीण चवीच्या पदार्थांचा आस्वाद घेता येणार आहे. त्याचसोबत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांसह इतर राज्यांतून आलेल्या कारागिरांचे वैविध्यपूर्ण स्टॉल्सही आकर्षणाचे केंद्र ठरत आहेत.

नागरिकांच्या सोयीसाठी प्रदर्शनाचे संपूर्ण क्षेत्र पूर्णतः वातानुकूलित आहे. ग्रामीण महिलांच्या पारंपारिक कौशल्याला जागतिक दर्जा मिळावा यासाठी या प्रदर्शनात उच्च दर्जाचे नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान आणि अत्याधुनिक मार्केटिंग पद्धतींचा वापर करण्यात आला आहे. डिजिटल व्यवहार आणि नाविन्यपूर्ण सादरीकरणामुळे ग्रामीण महिलांची उत्पादने आजच्या आधुनिक युगाशी स्पर्धा करण्यासाठी सज्ज झाली आहेत.

मंत्री जयकुमार गोरे यांनी म्हटले आहे की, बचत गटांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिला आज स्वावलंबी होत आहेत. इतर राज्यांतील आणि महाराष्ट्रातील या भगिनींच्या उत्पादनांची खरेदी करून कष्टकऱ्यांच्या आयुष्यात समृद्धी आणण्यासाठी मुंबई आणि नवी मुंबईतील नागरिकांनी मोठ्या संख्येने महालक्ष्मी सरस प्रर्दशनास आर्वजून भेट द्यावी, असे आवाहन ग्रामविकास मंत्री गोरे यांनी केले आहे.

### कोरेगावच्या समीर शेखची मुंबई पोलीस दलात झेप



**परतूर । प्रतिनिधी**

जिद्द आणि परिश्रमाच्या जोरावर परतूर तालुक्यातील कोरेगाव येथील सुपुत्र समीर शेख याने मुंबई पोलीस दलाचे खडतर प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केले आहे. नुकताच त्याचा दीक्षान्त संचलन सोहळा पार पडला असून, तो आता 'खाकी' वर्दीत देशसेवेसाठी सज्ज झाला आहे.ग्रामीण भागातील एका सामान्य कुटुंबातून आलेल्या समीरने कोणत्याही मोठ्या सुविधांशिवाय केवळ मेहनतीवर हे यश मिळवले. पोलीस भरतीची मैदानी व लेखी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्याने प्रशिक्षणाचा टप्पाही पूर्ण केला. त्याच्या या यशाबद्दल ग्रामस्थांनी त्याचे कौतुक केले आहे. आई-वडील, नातेवाईक आणि मित्रपरिवाराकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# प्रभाग ९ मध्ये घाणीचे साम्राज्य; प्रशासन झोपेत

## ८ दिवसांत कारवाई नाही तर थेट आंदोलन - नगरसेवक महावीर ढक्का यांचा इशारा





**जालना । प्रतिनिधी**

शहरातील प्रभाग क्रमांक ९ मध्ये स्वच्छतेचा प्रश्न आता गंभीर टप्प्यावर पोहोचला असून संपूर्ण परिसरात अक्षरशः घाणीचे साम्राज्य पसरले आहे. नाल्यांचे सांडपाणी थेट रस्त्यावर वाहत असून नागरिकांना दुर्गंधी, अस्वच्छता आणि आरोग्याच्या गंभीर धोक्यांना सामोरे जावे लागत आहे. या सर्व प्रकारावर संतप्त प्रतिक्रिया देत नगरसेवक महावीर ढक्का यांनी महानगरपालिका प्रशासनावर जोरदार हल्लाबोल केला आहे.

माध्यमांशी बोलताना ढक्का यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, प्रभागातील नाल्यांची साफसफाई पूर्णपणे ठप्प झाली आहे. नाल्यांमधून काढलेला कचरा आठ-आठ दिवस तसाच रस्त्यावर पडून राहत असल्यामुळे परिस्थिती अधिकच बिकट बनली आहे. ही फक्त दुर्लक्ष नाही, तर नागरिकांच्या आरोग्याशी खेळ आहे, असा संतप्त आरोप त्यांनी केला.

स्वच्छता निरीक्षकांकडे अनेक वेळा तक्रारी करूनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. प्रत्येक वेळी केवळ उडवाउडवीची उत्तरे देऊन नागरिकांची दिशाभूल केली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. यासोबतच महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त अर्जून गिराम यांनाही तोंडी माहिती देण्यात आली, मात्र प्रशासनाने याकडे पूर्णपणे कानाडोळा केल्याचे दिसून येत आहे.

विशेष म्हणजे, मस्तगड हा भाग नदीकाठी असल्यामुळे येथे मच्छरांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. गेल्या वर्षभरात एकदाही धूर फवारणी करण्यात आलेली नसल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांचा धोका वाढत असूनही प्रशासन मात्र निष्क्रिय असल्याचा आरोप होत आहे.

परिसरातील नागरिकांना रोज घाणीच्या आणि दुर्गंधीच्या वातावरणात जीवन जगावे लागत असून लहान मुले, वृद्ध आणि महिलांना याचा सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे. कर वसूल करताना तत्पर असणारे प्रशासन, नागरिकांच्या मूलभूत सुविधांकडे मात्र पूर्णपणे दुर्लक्ष करत आहे, अशी टीका ढक्का यांनी केली.

दरम्यान, प्रशासनाला अंतिम इशारा देत नगरसेवक महावीर ढक्का यांनी सांगितले की, येत्या आठ दिवसांत स्वच्छता आणि नागरी समस्या मार्गी लागल्या नाहीत, तर स्वच्छता निरीक्षकांच्या घरी कचरा टाकून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी महानगरपालिका प्रशासनाची असेल, असा इशाराही त्यांनी दिला. एकूणच, प्रभाग ९ मधील बिघडलेली स्वच्छता व्यवस्था ही महानगरपालिकेच्या कारभारावर मोठा प्रश्नचिन्ह उभे करत असून, आता नागरिकांना दिलासा कधी मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## जालना महानगरपालिकेतील कंत्राटी महिला सफाई कर्मचाऱ्यांचे निवेदन; न्यायाच्या मागणीसाठी पुन्हा आवाज बुलंद

**जालना । प्रतिनिधी**



जालना शहर महानगरपालिकेत गेल्या दहा वर्षांपासून कंत्राटी स्वरूपात काम करणाऱ्या महिला सफाई कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी पुन्हा एकदा निवेदन सादर केले आहे. ड. रिमा संदीप खरात (काळे) प्रभाग क्रमांक १४ अ नगरसेविका यांच्याकडे हे निवेदन देत कर्मचाऱ्यांनी न्यायाची मागणी केली आहे.

महानगरपालिका नगर परिषद असताना म्हणजेच २०१४ पासून या महिला कर्मचारी कंत्राटी पद्धतीने सेवा बजावत आहेत. मात्र, इतक्या वर्षांच्या सेवेनंतरही त्यांच्या जीवनमानात कोणताही सकारात्मक बदल झालेला नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. गेल्या दहा वर्षांत अनेक वेळा प्रशासन, आयुक्त व जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊनही त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

कंत्राटदारांकडूनही योग्य वागणूक मिळत नसल्याचे सांगत, लिंगभेदाच्या आधारावर वेतनात तफावत होत असल्याची गंभीर बाब त्यांनी मांडली. किमान वेतन कायद्यानुसार पगार मिळावा, अशी मागणी वारंवार करूनही त्यावर कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही, असे कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. महिला कर्मचाऱ्यांनी आपल्या निवेदनात काही महत्त्वाच्या मागण्या मांडल्या आहेत. त्यामध्ये कंत्राटी महिलांना नियमित काम देणे, रोख ऐवजी बँक खात्यातून पगार देणे, पुरुष कामगारांइतकाच समान पगार देणे, हजेरी व पगारपत्रकाची पारदर्शक नोंद ठेवणे तसेच नवीन भरती करताना कंत्राटी महिला कर्मचाऱ्यांना प्राधान्य देणे, या प्रमुख मागण्यांचा समावेश आहे.

या निवेदनावर खालील महिला सफाई कर्मचाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या असून त्यांनी एकमुखाने न्यायाची मागणी केली आहे : कुसुमबाई संजय वानखेडे, सुमनबाई रंगनाथ गायकवाड, संजिवणी सुंदरराव हिवाळे, छाया बबन खैरे, छाया खैर, प्रेमा देवानंद निर्मळ, मंगल वसंत कांबळे, संगिता राजु जगधने, सुरेखा विलास राजगिरे, इंदु संतोष साबळे, लताबाई बाबुराव ससाने, शारदा बबन वाघमारे. यांच्या सह्या आहेत या सर्व मागण्यांवर सकारात्मक विचार करून न्याय मिळून द्यावे अशी नम्र विनंती ड रिमा संदीप खरात (काळे) यांच्याकडे करण्यात आली

## शेतीयोग्य जमिनींचे वाटप करण्यासंदर्भातील कार्यवाही करावी - मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील

**मुंबई । प्रतिनिधी**




वारणा धरणग्रस्तांच्या मागण्यांचा सकारात्मक विचार करून शेतीयोग्य असणाऱ्या जमिनींचे लवकरात लवकर धरणग्रस्तांना वाटप करण्यासंदर्भातील कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिले. वारणा धरणग्रस्त व चांदोली अभयारण्यग्रस्त यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत आयोजित बैठकीत मंत्री श्री. जाधव-पाटील बोलत होते. बैठकीस आमदार जयंत पाटील, उपसचिव संजय इंगळे, सांगली जिल्हा पुनर्वसन अधिकारी रघुनाथ पोते यांच्यासह वारणा धरणग्रस्त आदी उपस्थित होते. पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, सांगली जिल्हाधिकारी अशोक काकडे, सांगली उपवनसंरक्षक गवते, प्रांताधिकारी श्रीनिवास अर्जुन दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

वारणा धरणग्रस्तांना देण्यात आलेल्या वर्ग २ च्या जमिनी वर्ग १ करण्याबाबत वित्त विभागाशी चर्चा करून त्यांचा अभिप्राय घेऊन फेरविचार करणे आवश्यक आहे, त्यानंतर त्यासंदर्भात योग्य ते धोरण तयार करता येईल. असेही मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी सांगितले. आमदार जयंत पाटील यांनी वारणा धरणग्रस्तांना शासनाने दिलेल्या वर्ग २ जमिनी आहेत, त्या सरसकटपणे वर्ग १ मध्ये रुपांतरित करण्यात याव्या, अशी मागणी केली.

यावेळी पुणे विभागीय आयुक्त व सांगली जिल्हाधिकारी यांना शिल्लक जमिनीपैकी वाटपयोग्य जमिनीचे तत्काळ वाटप सुरू करण्यासंदर्भा तील कार्यवाही करण्याचे निर्देश मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिले. चांदोली अभयारण्यग्रस्तंबाबत सांगली उपवनसंरक्षक यांनी वस्तुस्थिती मांडली. वारणा धरणग्रस्त व चांदोली अभयारण्यग्रस्त यांच्या सर्व प्रलंबित मागण्यांबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल, असे म्हणत मंत्री मकरंद जाधव पाटील सांगितले.

## रुबी हॉस्पिटलमध्ये तीन दिवसीय मोफत थायरॉईड तपासणी शिबिर

**जालना । प्रतिनिधी**





सौ. जमनाबाई शिवरतनजी बगडीया चॅरिटेबल ट्रस्ट आणि रोटरी क्लब ऑफ जालना रेनबो यांच्या संयुक्त विद्यमाने जालना शहरातील डॉ. राजेंद्र प्रसाद मार्गावरील रुबी हॉस्पिटल मध्ये २६ ते २८ मार्चदरम्यान सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत भव्य मोफत थायरॉईड निदान व तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. 'अब की बार थायरॉईड टेस्ट दस हजार पार' या संकल्पासह राबवल्या जाणाऱ्या या विशेष अभियानाचे हे ७२ वे शिबिर असून, आतापर्यंत ७ हजार चाचण्या पूर्ण झाल्या आहेत.

जालना शहरातील नागरिकांच्या आरोग्यासाठी राबवल्या जाणाऱ्या या उपक्रमात तज्ज्ञांमार्फत थायरॉईडची तपासणी केली जाणार आहे. या मोहिमेच्या यशस्वीतेसाठी सौ. जमनाबाई शिवरतनजी बगडीया चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष पन्नालाल बगडीया, रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोचे प्रकल्प प्रमुख रो. डॉ. राजेश सेठिया, अध्यक्षा रो. डॉ. प्रतिभा श्रीपत आणि सचिव रो. पंकज लड्डा विशेष परिश्रम घेत आहेत.

थायरॉईडच्या समस्यांचे वेळेत निदान व्हावे, या उद्देशाने आयोजित केलेल्या या तीन दिवसीय शिबिराचा लाभ जास्तीत जास्त गरजूंनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

## दोन कारची समोरासमोर धडक; एकाचा मृत्यू

**जालना । प्रतिनिधी**






जालन्यात दोन कारची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात एक जण ठार, तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. हा अपघात जाफराबाद-टेंभुर्णी रस्त्यावरील सावंगी फाट्याजवळ घडला.

विनोद बापूराव कळंबे (वय ४० वर्ष) असे मृताचे, तर रामेश्वर नामदेव नागरे असे जखमीचे नाव आहे. जाफराबाद येथील जिल्हा परिषदेचे शिक्षक विनोद कळंबे हे आपल्या कार (क्र. चह २१ ट ९५९५) ने टेंभुर्णीकडे येत होते. त्याच वेळी देऊळगावराजा येथील आरोग्यसेवक रामेश्वर नामदेव नारे हे आपला मित्र गजानन घारे यांच्यासह जाफराबाद तालुक्यातील देऊळझरी येथे बहिणीला भेटण्यासाठी त्यांच्या कार (क्र. चह २८ इथ ४३२६) ने जात होते. दरम्यान, सावंगी फाट्याजवळ दोन्ही कारची समोरासमोर धडक झाली. कारच्या दिशा बदलल्या. यामध्ये विनोद कळंबे यांची गाडी रस्त्याच्या कडेला जाऊन पलटी झाली. अपघातानंतर जखमींना तातडीने जालना येथे हलवण्यात आले. दरम्यान, विनोद कळंबे यांना डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. तर जखमी रामेश्वर नागरे यांच्यावर प्राथमिक उपचार टेंभुर्णी ग्रामीण रुग्णालयात करण्यात आले. या दुर्दैवी घटनेनं परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# विद्यार्थिनींच्या तक्रारींनी खरात प्रकरण गंभीर

**नाशिक । प्रतिनिधी**





नाशिकमध्ये भोंदूबाबा अशोक खरात प्रकरण अधिकच गंभीर बनत असून, त्याच्याविरोधात एकूण ६ गुन्हे दाखल झाल्याची माहिती समोर आली आहे. नव्याने दाखल झालेल्या तीन तक्रारींमध्ये विद्यार्थिनींचाही समावेश असल्याने प्रकरणाने धक्कादायक वळण घेतले आहे. धार्मिक विधी, लग्न जमवून देणे, भविष्य सांगणे अशा विविध बहाण्यांखाली महिलांवर अत्याचार केल्याचे आरोप पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहेत.

तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, अशोक खरातने विद्यार्थ्यांशीही गैरवर्तन केल्याचे उघड झाले असून, नव्या तक्रारींमुळे त्याच्या गुन्ह्यांची व्याप्ती अधिक वाढत आहे. त्यामुळे पोलिसांकडून तपास अधिक तीव्र करण्यात आला आहे. दरम्यान, अशोक खरातच्या पोलीस कोठडीची मुदत आज संपत असून, त्याला दुपारी २ वाजता नाशिक सत्र न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. आज न्यायालयात पोलिसांकडून काय बाजू मांडली जाते आणि पोलीस कोठडीत किती वाढ होते? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

या प्रकरणात आणखी एक मोठा खुलासा म्हणजे मिरगाव येथील 'श्री शिवनिका संस्थान'च्या आर्थिक व्यवहारांचा तपशील समोर आला आहे. ऑडिट रिपोर्टनुसार, २०२० ते २०२२ दरम्यान संस्थानचे उत्पन्न केवळ ४.९० लाखांच्या आसपास होते, तर १.६० ते १.६४ लाख रुपयांची तूटही नोंदवली गेली होती.

मात्र, २०२४ नंतर संस्थानच्या उत्पन्नात अचानक झपाट्याने वाढ झाली. तब्बल ७६ लाख ९१ हजार ४१६ रुपयांचे उत्पन्न नोंदवले गेले असून, खर्च वजा जाता ७०.६६ लाख रुपयांची शिल्लक राहिल्याचे दिसून आले आहे.

याशिवाय, संस्थानची मालमत्ता २०२२ मधील ९६ लाखांवरून २०२५ पर्यंत १ कोटी ८१ लाखांपर्यंत वाढली आहे. बँकेत २३ लाख ३५ हजार रुपयांच्या मुदत ठेवी असल्याची माहितीही समोर आली आहे. या अचानक वाढलेल्या उत्पन्नाचा स्रोत काय, देणग्या कोणाकडून आल्या, याचा तपास आता केंद्रस्थानी आला आहे. पोलिसांकडून आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी सुरू असून, या प्रकरणात आणखी मोठे खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, भोंदू अशोक खरातच्या गुन्ह्यांबाबत काही महत्त्वाची, उपयुक्त माहिती असल्यास खालील हेल्पलाईन नंबर्सवर संपर्क साधावा, आपली ओळख गोपनीय ठेवली जाईल, असे आवाहन SIT पथकाच्या प्रमुख खझड तेजस्वी सातपुते यांनी केले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक ज्योती मधुकर आडेकर यांनी डी.बी. कॉर्प लि. दिव्य मराठी, डी. १८१, शेंद्रा एम.आय.डी.सी. छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद) - ४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून, कार्यालय दैनिक महिला संवाद, सी-२०३, अनंत पार्क, काळेवाडी रोड, राहटनी, धनगर बाबा मंदीराजवळ, पुणे शहर, पुणे - ४११०१७(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. संपादक : ज्योती मधुकर आडेकर, मो. नं. ९१६८५६७१११, कार्यकारी संपादक : विद्या जाधव, उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड, मेल आयडी - mahilasanvad11@gmail.com, पीआरजीआय नोंदणी क्रमांक - **MHMAR/25/A1224**

Printer, Publisher & Owner Jyoti Madhukar Adekar, Printed At D. B. Corp Ltd., Divya Marathi, D 181, SHENDRA MIIDC Chatrapati Sambhaji Nagar (AURANGABAD) - 431003(Maharashtra), And Published At Office Daily Mahila Sanvad C-203, Anant Park, Kalevadi Road, Rahatni, Near Dhangar Baba Mandir, Pune City, Pune -411017 (Maharashtra), Editor : Jyoti Madhukar Adekar, Mob. No. 9168567111, Executive Editor : Vidya Jadhav, Deputy Editor : Sau. Sunanda Raju Nikrad, E-Mail : mahilasanvad11@gmail.com **PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224**